


'आयसीडब्ल्यूए'च्या औरंगाबाद शाखेतर्फे आयोजित 'केंद्रीय उत्पादन शुल्क' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी एस. के. जैन, आर. जी. मोदानी, भूपेंद्रपालसिंह, व्ही. एस दाते, ए. आर. जोशी, आर. बी. शुक्ला, एम. आर. पंडित, एस. के. वाया.

# केंद्रीय उत्पादन शुल्कावर 'आयसीडब्ल्यूए'तर्फे वर्ग

औरंगाबाद, ता. २५ : 'आयसीडब्ल्यूए'च्या औरंगाबाद शाखेतर्फे 'केंद्रीय उत्पादन शुल्क' या विषयावरील तीन महिने मुदतीच्या वर्गाचे उद्‌घाटन केंद्रीय उत्पादन आणि सीमा शुल्क खात्याचे आयुक्त भूपेंद्रपालसिंह यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी अप्रत्यक्ष कर सल्लागार आणि लेखक व्ही. एस. दाते होते.

केंद्र सरकारला करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची माहिती भूपेंद्रपालसिंह यांनी दिली. श्री. दाते यांनी अप्रत्यक्ष करांच्या तरतुदीविषयी मार्गदर्शन केले. शाखेचे सचिव राजेश शुक्ला यांनी परिचय करून दिला व सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष एस. के. जैन यांनी शाखेच्या उपक्रमांची माहिती दिली. हा वर्ग औद्योगिक क्षेत्रात कार्यरत कर्मचारी, विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल, असे मत प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष ए. आर. जोशी यांनी व्यक्त केले.

शाखेच्या अद्ययावत संगणक कक्षाचे उद्‌घाटन आणि मागील बॅचच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. एस. के. वाया यांनी आभार मानले. एम. आर. पंडित, आर. जी. मोदानी आणि विद्यार्थी उपस्थित होते.